International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# पक्षांतर बंदी कायदा व यामुळे राजकारणाची बदललेली दिशा : एक चिकित्सक अभ्यास

**पूजा परशराम शिंगाडे**
Research Student
**Corresponding Author: पूजा परशराम शिंगाडे**
**Email:** poojapshingade25@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14408853**

**प्रस्तावना:**

पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी देशात राजकीय अस्थिरता फार मोठ्या प्रमाणात होती. राजकीय अस्थिरतेमुळे देशाच्या विकासावर व अनेक शासकीय धोरणांवर पक्षांतरामुळे होणाऱ्या सत्ता बदलामुळे विपरीत परिणाम होऊन देशात अराजकता निर्माण होण्यास हेच पक्षांतर कारणीभूत असते. याच पक्षांतरामुळे राजकारणाची नीतीमूल्ये रास पावली आणि फोडाफोडीच्या राजकारणाला सुरुवात झाली. अस्थिरतेमुळे देशाचा ज्या प्रमाणात विकास झाला पाहिजे होता, त्या प्रमाणात विकास न झाल्याने या सर्व राजकीय कारणामुळे सर्वसामान्य जनतेला मात्र याचा नाहक त्रास झाला. पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी पूर्वी भारतीय राजकारणात पक्षांतर बंदीच्या विरोधात कोणतीही तरतूद नव्हती. आमदार किंवा खासदाराने पक्षांतर केले तरी सदस्यत्व रद्द केले जात नव्हते. सर्वप्रथम १९६७ साली हरियाणाचे एक आमदार गयालाल यांनी एका दिवसात तीन पक्ष बदलले. तेव्हापासून भारतीय राजकारणात 'आयाराम गयाराम' हे वाक्यप्रचारित झाले. १९६७ व १९७१ च्या निवडणुकीत निवडून आलेल्या १२५ पेक्षा जास्त खासदार व ४००० आमदारांपैकी ५०% आमदारांनी पक्षांतर केले. त्यामुळे देशात चांगलाच राजकीय गोंधळ निर्माण झाला. हरियाणाचे मुख्यमंत्री भजनलाल यांनी तर मंत्रिमंडळासह पक्षांतर केले. १९७९ साली जनता पक्षाच्या मोरारजी देसाई यांचे सरकार ७६ खासदारांच्या बंडांमुळे कोसळले होते. पक्षांतरे वाढु लागल्याने पक्षांतर बंदी कायद्याची आवश्यकता भासू लागली. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी एका समितीची स्थापना केली. समितीच्या शिफारशी प्रमाणे सर्व पक्षांच्या एकमताने १९८५ मध्ये ५२ वी घटना दुरुस्ती केली. याद्वारे घटनेत १० वे परिशिष्ट जोडले व कलम १०२ व १९१ अनुक्रमे संसद सदस्य व राज्य विधिमंडळ सदस्य यांना अपात्र ठरवणाऱ्या अनुच्छेदांमध्ये देखील बदल केला. या सर्व तरतुदींना 'पक्षांतर बंदी कायदा' म्हणतात.

- **पक्षांतर बंदी कायदा म्हणजे काय ?**

पक्षांतर म्हणजे एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याची प्रक्रिया होय. पण हितसंबंधाच्या राजकारणातून कुणीही कसेही पक्षांतर करतो. त्यामुळे उमेदवार विधानसभा किंवा लोकसभेला एका पक्षाच्या तिकिटावर निवडून येतो आणि आपले हित संबंध जोपासण्यासाठी तो दुसऱ्या पक्षात पक्षांतर करतो. यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे पक्षांतरावर निर्बंध लावण्यासाठी पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात आणला. त्याबद्दल बोलताना राजकीय विश्लेषक अभय देशपांडे यांनी असे प्रतिपादन केले आहे की, "पक्षांतर बंदी कायद्यामुळे तुम्ही ज्या पक्षातून निवडून आला आहात त्या पक्षाच्या विरोधात मतदान करता येऊ शकत नाही अशी तरतूद आहे."

- पक्षांतर बंदी कायद्याचा उद्देश :-

1. सोयीनुसार राजकीय पक्ष बदलणाऱ्या विधिमंडळ सदस्य व संसद सदस्य यांच्यावर नियंत्रण ठेवणे.
2. पक्षांतरामुळे निर्माण होणाऱ्या राजकीय अस्थितेवर अंकुश लावणे व राजकीय स्थैर्य प्राप्त करणे होय .
3. जनमताचा आदर अबाधित ठेवणे व राजकीय नीती मूल्यांचे संवर्धन करणे.

- **हा कायदा केव्हा लागू होतो ?**

1. जर कोणत्याही विधिमंडळ किंवा संसद सदस्याने स्वतःहून आपल्या पक्षाचा राजीनामा दिला.

2. जर कोणत्याही निवडून आलेल्या संसद किंवा विधिमंडळ सदस्याने पक्षाच्या आदेशाच्या किंवा विचारसरणीचे उल्लंघन केल्यास.
3. जर निवडून आलेल्या सदस्याने पक्षाचा व्हिप मानला नाही तर.
4. अन्य पक्षांना मदत करणे, त्यांच्या बैठकींना हजरी लावणे इ.
5. अपक्ष निवडून आलेल्या सदस्याने कोणत्याही पक्षाचे सदस्यत्व स्वीकारल्यास.
6. पदग्रहण केल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर जर नामनिर्देशित सदस्याने कोणत्याही पक्षात प्रवेश केल्यास सदस्य अपात्र ठरतो.

- **या कायद्यातील अपवाद**

जर कोणत्याही पक्षाचे २/३ विधिमंडळ सदस्य किंवा संसद सदस्य दुसऱ्या पक्षात जात असतील तर त्यांचं सदस्यत्व रद्द होत नाही. म्हणजेच जर एकनाथ शिंदे यांना भाजपात जायचं असेल आणि आपलं सदस्य रद्द होऊ द्यायचं नसेल, तर शिवसेनेच्या दोन तृतीयांश आमदारांचा एकनाथ शिंदे यांना समर्थन असायला पाहिजे. हा गट भाजपला समर्थन देऊ शकतो. अशा परिस्थितीत भाजप सत्ता स्थापन करू शकते व यामुळे नव्या गटातले व मूळचे पक्षातील आमदार अपात्र ठरत नाहीत.

- **पक्षांतर बंदी कायदा अपात्रता विषयी निर्णय कोण देते ?**

राज्यघटनेच्या १० अनुसूचीतील ६ व्या परिच्छेदानुसार लोकप्रतिनिधींना अपात्र ठरवण्याचा अंतिम निर्णय विधानसभा अध्यक्षांचा व लोकसभा अध्यक्षांचा असतो. तसेच तो पिठासीन अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असतो.

- **पक्षांतर बंदी कायदा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय**

राज्यघटनेत १० अनुसूची मधील परिच्छेद ६ मध्ये पक्षांतर बंदी कायद्यामुळे संसद आणि राज्य विधिमंडळ सदस्य अपात्रता निर्णय नमूद आहे. तर परिच्छेद ७ मध्ये अपात्रता निर्णयात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही असे होत. तर सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद ७ अवैद्य असल्याचा निर्णय दिला. त्यामुळे पिठासीन अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध संसद आणि राज्य विधिमंडळ सदस्याला न्यायालयात दात मागता येऊ शकते.

- **पक्षांतर बंदी कायद्यासंदर्भात घटना दुरुस्ती**

९१ घटना दुरुस्ती २००३ नुसार पक्षांतर बंदी कायद्यासंदर्भात केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामूहिक पक्षांतराला घटना बाह्य घोषित केले. मंत्रिमंडळाचा आकार १५% पर्यंत मर्यादित केला. १० व्या अनुसूची मधील कलम ३ रद्द केले. पक्षाच्या १/३ सदस्यांनी एकाच वेळी पक्षांतर केले तर त्यांचे सदस्यत्व रद्द होणार नाही अशी तरतूद होती त्यामुळे कलम ३ रद्द केले.

- पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे काय?

गेल्या काही वर्षात भारतीय राजकारणात जे काही पडसाद उमटले आहेत त्या पार्श्वभूमीवर अनेक तज्ञांना वाटते की पक्षांतर बंदी कायदा सुधारणा व्हायला हवी. जसं की पक्षांतर करणारा लोकप्रतिनिधी त्या पाच वर्षाच्या टर्ममध्ये निवडणूक लढवू शकणार नाही किंवा त्यांनी अविश्वास ठरावात पक्षाच्या विरोधात मत दिलं तर ते मत ग्राह्य धरलं जाणार नाही. अशा काही सुधारणांची गरज पक्षांतर बंदी कायद्यामध्ये आहे. अशी काही तज्ञांची मते आहेत.

**सारांश:**

पक्षांतर बंदी कायद्यामुळे राजकीय अस्थिरता समाप्त होऊन राजकीय स्थैर्य प्राप्त होण्यास मदत झाली आहे. विधिमंडळ आणि संसद सदस्यावर नियंत्रण ठेवता येणे शक्य झाले आहे व त्यामुळे देशातील बहुसंख्य लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदलास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणावर सदस्यांचे होणारे पक्षांतर थांबले. परंतु सामूहिक पक्षांतर वाढले आहे. १/३ सदस्यांनी पक्षांतर केल्यास त्यांच्या सदस्यत्व रद्द होणार नाही अशी तरतूद १० व्या अनुसूचीच्या कलम ३ मध्ये होती. ही तरतूद सुद्धा राजकीय स्थैर्य प्राप्त करण्यास अपयशी ठरली होती. त्यामुळे २००३ साली १० व्या अनुसूचीमध्ये ९१ वी घटनादुरुस्ती करून एखाद्या पक्षातील १/३ सदस्यांनी पक्षांतर केल्यास त्यांना अपात्र ठरवले जाऊ शकते अशी तरतूद केली आहे. १/३ ऐवजी २/३ सदस्यांनी केलेले पक्षांतर वैद्य ठरवले. त्यामुळे अवैध पक्षांतरावर नियंत्रण आले, परंतु या तरतुदीने सुद्धा भ्रमनिरास झाला. कारण एकनाथ शिंदे यांचा शिवसेनेतील व अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बंड हा कायदा थांबवू शकला नाही. त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या राजकीय गोंधळ निर्माण झाला. त्यामुळे या कायद्यातील

तरतुदी पुन्हा संशोधित करून कडक कायदे करणे ही आज ज्या काळाची गरज आहे.

**संदर्भ:**


1. लक्ष्मीकांत एम. - इंडियन पॉलिटी, MC Grawhill Punlication, 7 वी आवृत्ती.
2. कश्यप सुभाष, आपले संविधान, National book Trust, India publication.
3. कश्यप सुभाष, आपली संसद, National book Trust, India publication.
4. BBC न्यूज मराठी, २१ जून २०२२, "पक्षांतर बंदी कायदा काय आहे, इंडियन बरोबर किती आमदार बाहेर पडल्यास सरकार पडू शकते?"
5. दैनिक लोकसत्ता, २०२२-६-२३, "पक्षांतर बंदी कायदा म्हणजे काय, आमदारांवर काय कारवाई होते?"
6. महाराष्ट्र टाइम्स, २०२२-६-२४, "पक्षांतर बंदी कायदा म्हणजे काय?"
7. Kashyp Subhash , Anti-Defection Law and parliamentary privelleges(2 Vol) 4 th edition